Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. ११ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ९३ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

शासकीय आयटीआय जळगावच्या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात
(पान २ वर)

राज्यभर भेसळखोर, बोगस औषध विक्रेते आणि नियमभंग करणाऱ्यांवर धडक कारवाई

भागो..! तुकाराम मुंढे आया है..!

पुणे, मुंबई, बीड, सोलापूर, संभाजीनगरसह अनेक ठिकाणी एफडीएची धडक मोहीम

जन सम्राट टाईम्स

मुंबई । अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभर सुरू केलेल्या 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेमुळे भेसळखोर, बिनपरवाना औषध उत्पादक आणि नियमबाह्य व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

राज्यातील विविध जिल्ह्यांत सलग छापेमारी करून मोठ्या प्रमाणात भेसळयुक्त अन्नपदार्थ, बोगस औषधे आणि नियमबाह्य साठे जप्त करण्यात आले असून अनेकांविरुद्ध गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.या मोहिमेतील सर्वात मोठी कारवाई लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील किल्लारीवाडी येथे करण्यात आली. नीलकंठेश्वर दूध संकलन व शीतकरण केंद्रावर एफडीए आणि पोलिसांनी संयुक्त छापा टाकून ४,२२५ किलो Whey Permeate Powder आणि ७,५०० लिटर भेसळयुक्त दूध असा एकूण ५.०३ लाख रुपयांचा साठा

जागेवरच नष्ट केला. प्राथमिक तपासात हे दूध हैदराबादमधील विविध डेअऱ्यांना पुरवले जात असल्याचे समोर आले असून केंद्राचे मालक, कर्मचारी आणि पावडर पुरवठादाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मुंबईतील दहिसर येथे गुन्हे शाखा आणि एफडीएच्या संयुक्त कारवाईत अमूल, गोकुळसह नामांकित कंपन्यांच्या दूध पिशव्यांमध्ये पाणी मिसळून विक्री होत असल्याचा प्रकार उघड झाला. या कारवाईत ४७० लिटर भेसळयुक्त दूध आणि अन्य साहित्य जप्त करण्यात आले असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. दिशाभूल करणारे दावे करणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांवर कारवाई करण्यात आली. 'मेरा रूप श्रृंगार क्रीम'चे नमुने तपासणीसाठी पाठवून ३६ हजार रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. दरम्यान, सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील हॉस्पिटल मेडिकल स्टोअर्समध्येही गंभीर नियमभंग उघडकीस आले. रुग्णांना विशिष्ट मेडिकलमधूनच औषधे घेण्यास भाग पाडणे, नियमबाह्य औषध विक्री, एक्सपायरी औषधांची अयोग्य साठवण अशा त्रुटी आढळल्याने संबंधित मेडिकल स्टोअर्सवर कठोर कारवाई करण्यात आली. काही ठिकाणी विक्री परवाने रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही

अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत अशा कारवाया पुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असून, नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. संशयास्पद अन्नपदार्थ, औषधे किंवा भेसळीची माहिती नागरिकांनी जवळच्या एफडीए कार्यालयाला देण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

Selected

जळगावात इलेक्ट्रिकल्स दुकानाला आग

जळगाव | जळगाव शहरातील सत्यम पार्क परिसरातील सोपाननगर, दूध फेडरेशन रोडवरील दिनेश इलेक्ट्रिकल्स या दुकानाला शुक्रवारी (दि. १० जुलै) सकाळी अचानक आग लागली. अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत काही वेळातच आग आटोक्यात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. या आगीत सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. अग्निशमन विभागाला सकाळी ८.५० वाजता प्राची तायडे यांनी दूरध्वनीद्वारे दुकानाला आग लागल्याची माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन मुख्यालयातील बंब तातडीने घटनास्थळी रवाना झाला. जवानांनी पाण्याचा मारा करून आगीवर वेळीच नियंत्रण मिळवले. या आगीत दुकानातील पंखे, कुलर, इलेक्ट्रिक मोटारी तसेच इतर इलेक्ट्रिकल साहित्य जळून खाक झाले. प्राथमिक अंदाजानुसार सुमारे ₹५० हजारांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जानवी ठाकरे प्रकरणात दोषींना फाशीची शिक्षा द्या

महाराष्ट्र परिट सेवा मंडळाचे निवेदन

जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी: धुळे शहरातील गोळीबार टेकडी परिसरातील १५ वर्षीय अल्पवयीन जानवी जितेंद्र ठाकरे हिच्या मृत्यूप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करून हा खटला विशेष जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायालयात चालविण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र परिट सेवा मंडळ आणि धुळे जिल्ह्यातील समाजबांधवांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दोषींना कठोरात कठोर शिक्षा, तसेच फाशीची शिक्षा देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, अल्पवयीन जानवी ठाकरे हिला सातत्याने मानसिक छळ सहन करावा लागला आणि त्यातून तिने आत्महत्या केल्याचा आरोप आहे. ही घटना केवळ एका मुलीवरील अन्याय नसून संपूर्ण समाजाच्या सन्मानावर आणि महिला सुरक्षेवर झालेला गंभीर आघात असल्याची भावना समाजबांधवांनी व्यक्त केली. घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र परिट सेवा मंडळाचे कार्यकर्ते संजय वाल्हे आणि दीपक वाघ यांनी तातडीने पोलीस ठाण्यात धाव घेत सखोल तपासाची मागणी केली. त्यानंतर मुख्य संशयिताला अटक करण्यात आली असली, तरी केवळ अटक करून प्रकरण संपणार नाही. या गुन्ह्यातील सर्व संबंधितांवर कठोर कलमांखाली कारवाई करून दोषारोपपत्र लवकर दाखल करावे, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात हा खटला नियमित न्यायालयात न चालवता विशेष फास्ट ट्रॅक कोर्टात वर्ग करून पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. तपासात कोणताही विलंब किंवा हलगर्जीपणा होऊ नये, असेही समाजबांधवांनी प्रशासनाला बजावले. यावेळी समाजबांधवांनी स्पष्ट केले की, ही लढाई केवळ एका कुटुंबाची नसून राज्यातील प्रत्येक मुलीच्या सुरक्षिततेशी संबंधित आहे.

ऊसतोड कामगारांना हक्काची ओळख; पिपंळगाव बु. येथे कामगार ओळखपत्रांचे वाटप

जन सम्राट टाईम्स

पहूर / पिपंळगाव बु. : ऊसतोड कामगारांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सक्षमीकरणासाठी राज्य शासनाच्या लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांतर्गत जामनेर तालुक्यातील पिपंळगाव बु. येथे नोंदणीकृत ऊसतोड कामगारांना अधिकृत कामगार ओळखपत्रांचे (कामगार कार्ड) वितरण करण्यात आले. स्मार्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड अंतर्गत PK SKILL FOUNDATION यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. या ओळखपत्रामुळे ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेणे अधिक सुलभ होणार असून, त्यांची अधिकृत नोंद शासनाकडे उपलब्ध राहणार आहे. कार्यक्रमात PK SKILL FOUNDATIONच्या संचालिका अर्चना वानखेडे यांनी मोफत नोंदणी मोहिमेची माहिती देत कामगार कार्डाचे महत्त्व विशद केले. शासनाच्या विविध योजना, विमा संरक्षण, शैक्षणिक सुविधा आणि आर्थिक मदतीचा लाभ घेण्यासाठी हे कार्ड अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामसेवक राजेश

म्हस्के यांनी ऊसतोड कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी ही नोंदणी महत्त्वाची असल्याचे सांगितले. तर मा.सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते पिंटू भाऊ पाटील यांनी आरोग्य, शिक्षण, विमा, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा तसेच अपघात विमा यांसारख्या योजनांचा लाभ या कार्डाच्या माध्यमातून मिळणार असल्याचे स्पष्ट केले. यावेळी जळगाव जिल्हा वेंडर गणेश वानखेडे यांनी अद्याप नोंदणी न केलेल्या पात्र ऊसतोड कामगारांनी तातडीने मोफत नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन केले. सर्व पात्र कामगारांना टप्प्याटप्प्याने ओळखपत्रांचे वितरण करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली. कार्यक्रमाला सरपंच सौ. कल्पना विकास पाटील, उपसरपंच भारत सुभाष मोहने, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने ऊसतोड कामगार उपस्थित होते. कामगारांनी या उपक्रमाचे स्वागत करत,दुर्लक्षित राहिलेल्या ऊसतोड कामगारांना आता शासनाकडून अधिकृत ओळख आणि हक्काच्या योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग खुला झाल्याची भावना व्यक्त केली.

कामगारांनी मोफत नोंदणी करून घ्यावी

शासनाच्या विविध योजना, विमा संरक्षण, शैक्षणिक सुविधा आणि आर्थिक मदतीचा लाभ घेण्यासाठी हे कार्ड अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तर मा. सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते पिंटू भाऊ पाटील यांनी आरोग्य, शिक्षण, विमा, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, वसतिगृह सुविधा तसेच अपघात विमा यांसारख्या योजनांचा लाभ या कार्डाच्या माध्यमातून मिळणार असल्याचे स्पष्ट केले.

ग्रामसेवकाअभावी रिंगणगावची विकासकामे ठप्प; पाणीपुरवठा विस्कळीत, ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स

एरंडोल । प्रतिनिधी । एरंडोल तालुक्यातील रिंगणगाव ग्रामपंचायतीत गेल्या दीड ते दोन महिन्यांपासून ग्रामसेवक आजारी रजेवर असल्याने ग्रामपंचायतीचा कारभार पूर्णपणे विस्कळीत झाला आहे. अतिरिक्त ग्रामसेवकाची नियुक्ती करण्यात आली असली तरी त्यांनी अद्याप स्वाक्षरीचे अधिकार स्वीकारले नसल्याने पाणीपुरवठा, विकासकामे आणि प्रशासकीय कामकाज ठप्प झाले आहे. यामुळे संतप्त ग्रामस्थ आता जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन देणार आहेत. गावात नव्याने टाकण्यात आलेली पाणीपुरवठ्याची पाइपलाइन वारंवार फुटत असल्याने अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाणीगळती होत आहे. परिणामी नागरिकांना नियमित पाणीपुरवठा होत नसून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात या गळतीमुळे दूषित पाणीपुरवठा होऊन साथीचे आजार पसरण्याची भीतीही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. ग्रामपंचायतीवर सध्या प्रशासकाची नियुक्ती असली तरी त्यांच्याकडे आवश्यक आर्थिक व प्रशासकीय अधिकार नसल्याने विकासकामांचे प्रस्ताव, दैनंदिन कामकाज,

पाणीपुरवठ्याच्या दुरुस्तीची कामे आणि इतर अत्यावश्यक प्रशासकीय निर्णय रखडले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार अक्षरशः ठप्प झाल्याचे चित्र आहे. ग्रामस्थांनी या समस्येबाबत वारंवार एरंडोल पंचायत समितीकडे तक्रारी करूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे आता ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर करण्यात येणार आहे.

> "रिंगणगाव ग्रामपंचायतीला ग्रामसेवक असूनही त्यांनी स्वाक्षरीचे अधिकार स्वीकारले नसल्याने संपूर्ण कारभार ठप्प झाला आहे. भर पावसाळ्यात पाणीगळतीमुळे रोगराईचा धोका निर्माण झाला असून प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.
>
> -भरत महाजन, ग्रामस्थ, रिंगणगाव

एरंडोलच्या 'वसंत सहकारी साखर कारखान्या'ची विक्री

थकीत कर्जापोटी होणार ई-लिलाव

जन सम्राट टाईम्स

कासोदा । प्रतिनिधी एरंडोल तालुक्यातील कासोदा येथील अवसायनात गेलेल्या 'वसंत सहकारी साखर कारखाना लि.' च्या विक्रीसाठी जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने (JDCC Bank) ई-लिलावाची (ई-ऑक्शन) जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. थकीत कर्जाच्या वसुलीसाठी 'सरफेसी कायदा २००२' अंतर्गत ही कारवाई केली जात असून, येत्या २३ जुलै २०२६ रोजी या कारखान्याचा ऑनलाईन लिलाव पार पडणार आहे.वसंत सहकारी साखर कारखान्याकडे ३० जून २०२६ अखेर मोठी थकबाकी आहे. यात १८२३.२० लाख रुपये (सुमारे १८ कोटी २३ लाख) मुद्दल आणि त्यावर ७५४०.८५ लाख रुपये (सुमारे ७५ कोटी ४० लाख) व्याज व इतर खर्च असा मोठा बोजा आहे. या रकमेच्या वसुलीसाठी बँकेने कारखान्याची मालमत्ता विक्रीस काढली आहे.या लिलावामध्ये कारखान्याची तब्बल १०३.१९ हेक्टर जमीन, त्यावरील संपूर्ण बांधकाम, प्लांट आणि मशिनरी यांचा समावेश आहे. ही विक्री 'जसे आहे जिथे आहे' आणि 'जे आहे ते आहे' या तत्त्वावर केली जाणार आहे.ही ई-लिलाव प्रक्रिया 'एमएसटीसी लिमिटेड' (MSTC Ltd.) या संस्थेमार्फत राबविली जात आहे. लिलावात भाग घेण्यासाठी इच्छुकांना एमएसटीसीकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. या प्रक्रियेच्या सविस्तर अटी व शर्ती जाणून घेण्यासाठी https://www.mstcecommerce.com किंवा जळगाव जिल्हा बँकेच्या www.jdccbank.in या अधिकृत वेबसाईटला भेट देण्याचे आवाहन बँकेतर्फे करण्यात आले आहे.बँकेचे प्राधिकृत अधिकारी भिकन वसंतराव वाघ यांनी या सूचनेत स्पष्ट केले आहे की, सरफेसी कायद्यानुसार कर्जदार आणि जामीनदार यांना ३० दिवसांची वैधानिक सूचना देण्यात येत आहे. त्यांनी लिलावाच्या तारखेपूर्वी थकीत कर्जाची रक्कम (व्याज व खर्चासहीत) न भरल्यास, कारखान्याची मालमत्ता लिलावात विकली जाईल. तसेच, मालमत्ता विकूनही बँकेचे कर्ज न फिटल्यास उर्वरित रक्कम कर्जदारांकडून वसूल केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

लिलावाच्या तारखा

* राखीव किंमत (बेस प्राईज): कारखान्यासाठी ५२८३.८१ लाख रुपये (सुमारे ५२ कोटी ८३ लाख) इतकी राखीव किंमत निश्चित करण्यात आली आहे.
* अनामत रक्कम (ईएमडी): लिलावात सहभागी होणाऱ्या इच्छुकांना ५२८.३८ लाख रुपये (सुमारे ५ कोटी २८ लाख) अनामत रक्कम म्हणून भरावे लागतील.
* मालमत्ता पाहणीचा कालावधी: इच्छुक खरेदीदारांना कारखान्याची पाहणी करण्यासाठी १० जुलै २०२६ ते २२ जुलै २०२६ या दरम्यान (सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत) वेळ देण्यात आला आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

पाचोरा कृषी उत्पन्न बाजार समितीतील अस्वच्छतेविरोधात निवेदन

भाजीपाला मार्केटमधील सडका कचरा, दुर्गंधी व आरोग्य धोक्याचा मुद्दा

जन सम्राट टाईम्स

पाचोरा | प्रतिनिधी : पाचोरा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भाजीपाला मार्केट परिसरात सडका भाजीपाला, जैविक कचरा, घनकचरा आणि प्लास्टिक कचरा उघड्यावर साचत असल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनल्याचा आरोप करत पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप दामोदर महाजन यांनी विविध शासकीय विभागांकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे. सात दिवसांत ठोस कारवाई न झाल्यास कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावर "अर्धनग्न होऊन भीक मांगो आंदोलन" करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे. महाजन यांनी जिल्हाधिकारी,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कृषी पणन संचालक, सहकार विभाग, जिल्हा परिषद, नगरपरिषद, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, भाजीपाला मार्केटमध्ये दररोज मोठ्या प्रमाणात सडका भाजीपाला, फळे, खराब धान्य, पालेभाज्या, प्लास्टिक व इतर जैविक कचरा उघड्यावर टाकला जात असून तो अनेक दिवस न उचलल्याने परिसरात असह्य दुर्गंधी पसरत आहे. त्यामुळे बाजार समितीसमोरील रहिवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचा दावा करण्यात आला आहे.महाजन यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, त्यांचे निवासस्थान बाजार समितीसमोर असल्याने या अस्वच्छतेचा सर्वाधिक परिणाम त्यांच्या कुटुंबावर होत आहे. दुर्गंधीमुळे घराच्या खिडक्या उघडणे, जेवण करणे तसेच लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना घरात राहणेही कठीण झाले असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सडलेल्या कचऱ्यामुळे माशा, डास, उंदीर व भटकी कुत्री यांचा वावर वाढून डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. याशिवाय बाजार समिती परिसरात उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडसाठी आवश्यक कायदेशीर परवानग्या व मंजूर आराखडा आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. महाजन यांनी पर्यावरण अधिनियम, १९८६, घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६, महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम तसेच भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ चा उल्लेख करत बाजार समिती ही मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणारी संस्था) असल्याने संबंधित नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे.

भीक मांगो आंदोलन" करण्यात येईल

निवेदनात जिल्हास्तरीय संयुक्त समितीकडून प्रत्यक्ष पाहणी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरणीय तपासणी, संपूर्ण कचरा तातडीने हटविणे, नियमित स्वच्छता व्यवस्था, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई आणि कायमस्वरूपी कचरा व्यवस्थापनाची अंमलबजावणी अशा १४ प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. महाजन यांनी स्पष्ट केले आहे की, सात दिवसांत ठोस कार्यवाही न झाल्यास कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावर "अर्धनग्न होऊन भीक मांगो आंदोलन" करण्यात येईल.

एटीएम कार्डाची हातचलाखी करून फसवणूक करणारी आंतरराज्यीय टोळी जेरबंद; 5.23 लाखांचा मुद्देमाल जप्त

हरियाणा-उत्तर प्रदेशातील चार आरोपी अटकेत, एटीएम फसवणुकीचे चार गुन्हे उघड

जन सम्राट टाईम्स

शिरपूर : शिरपूर शहरात एटीएम कार्ड हातचलाखीने बदलून नागरिकांच्या खात्यातील रक्कम लंपास करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा शिरपूर शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. हरियाणा व उत्तर प्रदेशातील चार आरोपींना अटक करून त्यांच्याकडून सुमारे ५ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, या कारवाईमुळे एटीएम फसवणुकीचे चार गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २३ जून २०२६ रोजी दुपारी साडेएक ते दोनच्या सुमारास पेंशनर दिपक अमृत चौधरी (वय ६६, रा. पित्रेश्वर कॉलनी, शिरपूर) हे सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी तीन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्याशी संवाद साधून एटीएममध्ये रोख रक्कम उपलब्ध आहे का, अशी विचारणा केली. बोलण्यात गुंतवून ठेवत त्यांपैकी एकाने चौधरी यांचे एटीएम कार्ड हातचलाखीने बदलले आणि त्याच कार्डच्या माध्यमातून १७ हजार ३०० रुपये काढून फसवणूक केली. या प्रकरणी शिरपूर शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान पोलिसांनी यापूर्वीच्या एटीएम फसवणुकीच्या

गुन्ह्यांचा अभ्यास करून आरोपींच्या कार्यपद्धतीचे विश्लेषण केले. घटनास्थळासह शहरातील आणि राष्ट्रीय महामार्गावरील अनेक सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यातून एका पांढऱ्या रंगाच्या कारचा संशय आल्याने तिचा मागोवा घेण्यात आला.

विविध टोल नाक्यांवरील माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला. तपासादरम्यान संबंधित कार चांदवड (जि. नाशिक) येथील एका हॉटेलसमोर उभी असल्याची माहिती मिळाली.

पोलिसांनी सापळा रचून हॉटेलमधून बाहेर येताच चौघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांची नावे अलीम रमजान मेव (वय ३२), समुन रमजान मेव (वय ३८), नासिर दिनू मेव (वय २७) (तिघेही रा. पलवल, हरियाणा) तसेच सलमान फजरुद्दीन मेव (वय २८, रा. बुलंदशहर, उत्तर प्रदेश) अशी असल्याचे निष्पन्न झाले.चौकशीत आरोपींनी एटीएम केंद्रांमध्ये विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून त्यांना बोलण्यात गुंतवून ठेवत एटीएम कार्ड बदलण्याची कबुली दिली. त्यानंतर कार्डचा क्लोन तयार करून खात्यातील रक्कम काढली जात असल्याचेही उघड झाले. या टोळीच्या ताब्यातून ५ लाख २३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, तपासात अशाच प्रकारे केलेले चार एटीएम फसवणुकीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांकडून या टोळीच्या इतर गुन्ह्यांचाही तपास सुरू आहे.

यांनी केली कारवाई

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली. या पथकात रविंद्र अखडमल, अतुल पाटील, सचिन वाघ, सोमा ठाकरे, आरिफ तडवी, विनोद अखडमल, भटू साळुंखे, मनोज महाजन, योगेश दाभाडे, गोविंद कोळी, मनोज दाभाडे, प्रशांत पवार आणि अमोल पाटील यांचा समावेश होता.

पाचोर्यात प्लॉट विक्रीच्या आमिषाने महिलेची फसवणूक

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : पाचोरा शहरात प्लॉट विक्रीच्या व्यवहारातून एका महिलेची १३ लाख ५१ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. स्वतःच्या मालकीचा प्लॉट असल्याचे सांगून मोठी रक्कम स्वीकारल्यानंतरही प्लॉटचा ताबा व आवश्यक कागदपत्रे न दिल्याचा आरोप करण्यात आला असून, याप्रकरणी पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनाली संदीप शेवरे (वय ४४, रा. गणेश कॉलनी, पाचोरा) यांनी याबाबत फिर्याद दाखल केली आहे. घर बांधण्यासाठी त्यांनी पाचोरा शहरातील सिटी सर्व्हे क्रमांक ३०३५, गट क्रमांक ३५, प्लॉट क्रमांक २२ येथील जागेचा व्यवहार केला होता. फिर्यादीनुसार, रविंद्रसिंग सुमेरसिंग राजपूत (रा. पाचोरा) याने संबंधित प्लॉट स्वतःच्या मालकीचा असल्याचे सांगून ५ ऑगस्ट २०२४ ते १ जून २०२६ या कालावधीत

विविध टप्प्यांमध्ये फिर्यादीकडून १३ लाख ५१ हजार रुपये स्वीकारले. मात्र, संपूर्ण रक्कम घेतल्यानंतरही प्लॉटचा ताबा दिला नाही किंवा व्यवहाराशी संबंधित आवश्यक कागदपत्रेही उपलब्ध करून दिली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून पाचोरा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३१/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१८(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप शेवाळे करीत आहेत. पाचोरा शहरात प्लॉट विक्रीच्या व्यवहारातून एका महिलेची १३ लाख ५१ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

जळगावत मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ

पाच पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : जळगाव जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, गेल्या काही दिवसांत पारोळा, जामनेर, यावल आणि रावेर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दुचाकी चोरीचे स्वतंत्र गुन्हे दाखल झाले आहेत. याशिवाय चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीची घटना घडली असून, या प्रकरणात पोलिसांनी एका संशयिताला अटक केली आहे. सर्व घटनांचा पुढील तपास संबंधित पोलीस ठाण्यांकडून सुरू आहे. पारोळा शहरातील राजीव गांधी नगर परिसरात २ ते ३ जुलैदरम्यान घरासमोर उभी असलेली सुमारे ५० हजार रुपये किमतीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केली. याप्रकरणी पारोळा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जामनेर तालुक्यात सार्वजनिक ठिकाणावरून २५ हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली आहे. या प्रकरणी जामनेर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून अज्ञात चोरट्यांचा शोध सुरू आहे. यावल तालुक्यातील किनगाव येथे घरासमोर उभी असलेली ५० हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. रावेर तालुक्यातील शेत परिसरातून ५० हजार रुपये किमतीची बजाज

प्लॅटिना मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना घडली. चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळगाव येथे घरफोडी करून ६ हजार रुपयांची रोकड चोरून नेण्यात आल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी एका संशयिताला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. जिल्ह्यात वाढत्या वाहनचोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, वाहनधारकांनी दुचाकी सुरक्षित ठिकाणी उभी करणे, लॉकिंग सिस्टीमचा वापर करणे आणि सीसीटीव्ही असलेल्या परिसरात वाहने पार्क करण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

पोलिसांनी एका संशयिताला अटक केली

पारोळा शहरातील राजीव गांधी नगर परिसरात २ ते ३ जुलैदरम्यान घरासमोर उभी असलेली सुमारे ५० हजार रुपये किमतीची मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लंपास केली. याप्रकरणी पारोळा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जामनेर तालुक्यात सार्वजनिक ठिकाणावरून २५ हजार रुपये किमतीची हिरो स्प्लेंडर मोटारसायकल चोरीला गेल्याची तक्रार दाखल झाली.

किरकोळ वादाचे हिंसक रूप; लोखंडी रॉडने हल्ल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

एरंडोल । प्रतिनिधी : एरंडोल शहरातील उत्तमनगर परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे हिंसक रूप धारण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात चौघांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याचा तसेच लोखंडी रॉडने हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला असून, एरंडोल पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जुलै रोजी दुपारी सुमारे ४ वाजता फिर्यादी भीमा गोकुळ बरेला (वय ३२, रा. उत्तमनगर, एरंडोल) हे आपल्या भावासोबत परिसरातील किराणा दुकानाकडे जात असताना किरकोळ कारणावरून वाद झाला. वाद वाढल्यानंतर चौघांनी शिवीगाळ करत मारहाण केल्याची तक्रार फिर्यादीने पोलिसांकडे दिली.

या प्रकरणी सुरेश मांगीलाल बरेला, सुभाष उर्फ टकल्या कालूराम बरेला, राजू मांगीलाल बरेला आणि मांगीलाल बरेला (सर्व रा. उत्तमनगर, एरंडोल) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, मारहाणीदरम्यान एका संशयिताने लोखंडी रॉडने हल्ला केला. या घटनेत फिर्यादीसह अन्य काही जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक दत्तात्रय ठाकरे करीत आहेत.

भुसावळ बस स्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीवर धडक कारवाई

₹२७,५०० दंड वसूल, एसटी व वाहतूक पोलिसांची संयुक्त मोहीम

जन सम्राट टाईम्स

भुसावळ | प्रतिनिधी : औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार तसेच राज्याचे परिवहन मंत्री यांच्या निर्देशानुसार भुसावळ बस स्थानक व परिसरातील अवैध प्रवासी वाहतुकीला आळा घालण्यासाठी राज्य परिवहन महामंडळ (एसटी) आणि स्थानिक वाहतूक पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने विशेष धडक मोहीम राबविण्यात येत आहे. १ ते १० जुलै २०२६ या कालावधीत ५२ अवैध वाहनांवर कारवाई करून २७ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एसटी बस स्थानक परिसरात महामंडळाच्या अधिकृत

वाहनांव्यतिरिक्त कोणत्याही खासगी वाहनांना प्रवासी भरणे, उतरविणे किंवा वाहन उभे करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जळगाव विभागात विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.

या मोहिमेअंतर्गत मंगळवारी (दि. ७ जुलै) जळगाव विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी दीपक जाधव यांनी भुसावळ बस स्थानकाला अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी भुसावळ वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संयुक्त कारवाईदरम्यान बस स्थानक परिसरात विनापरवाना व अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांना समज देण्यात आली.

तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर जागेवरच दंडात्मक कारवाई करण्यात आली.

यावेळी जळगाव विभागाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी दीपक जाधव, भुसावळ आगार व्यवस्थापक राकेश शिवंदे, बस स्थानकाचे स्टँड इन्चार्ज जयेश लोहार तसेच वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या मोहिमेच्या सातव्या दिवसापर्यंत ५२ अवैध वाहनांवर कारवाई करून ₹२७,५०० इतका दंड वसूल करण्यात आला आहे. ही मोहीम १० जुलैपर्यंत सुरू राहणार असून, अवैध प्रवासी वाहतुकीविरोधातील कारवाई भविष्यात आणखी तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

चाळीसगावात अन्न सुरक्षा विभागाची मोठी कारवाई

६.५७ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त, पाच जण अटकेत

जन सम्राट टाईम्स

चाळीसगाव । प्रतिनिधी : चाळीसगाव शहरात अन्न सुरक्षा विभाग आणि पोलिसांनी संयुक्तपणे राबविलेल्या धडक कारवाईत प्रतिबंधित गुटखा, पानमसाला व सुगंधी तंबाखूचा मोठा साठा जप्त केला. या कारवाईत एकूण ६ लाख ५७ हजार ८७ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

अन्न सुरक्षा अधिकारी शरद मधुकर पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चाळीसगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

९ जुलै २०२६ रोजी मध्यरात्री हनुमानवाडी, आनंदवाडी आणि बसस्थानक परिसरात एकाचवेळी छापेमारी करण्यात आली. कारवाईदरम्यान विमल पान मसाला, डायरेक्टर स्पेशल, पान पराग, आरएमडी, रजनीगंधा, राजश्री, राजनिवास, मिराज, केर कोकिल, तुळशी-००, रॉयल जाफरानी जर्दा, एम सुगंधी तंबाखू, बाबा, शॉट, केपी डबल ब्लॉक, झेडएन-०१ जाफरानी जर्दा यांसह विविध प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. याशिवाय एमएच-१८ डब्ल्यू-८९७७ क्रमांकाची टाटा इंडिका कारही पोलिसांनी ताब्यात घेतली. या प्रकरणी अजित चांदुमल रावलानी (४३), कुबेर शेखर कदम (२७), हितेश किशोर पवार (२१), निखिल राजेंद्र केसरवाणी (३१) आणि सौरभ संजय शिनकर (२७) यांना अटक करण्यात आली आहे. प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक व विक्री केल्याप्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड आणि पोलीस निरीक्षक अमितकुमार मने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप घुले करीत आहेत,

पाचोरा-भडगाव मतदारसंघातील वीज प्रश्नांवर महत्त्वपूर्ण बैठक

महावितरण व लोकप्रतिनिधी एकाच व्यासपीठावर

जन सम्राट टाईम्स

पाचोरा | प्रतिनिधी : पाचोरा-भडगाव विधानसभा मतदारसंघातील वीजपुरवठ्याशी संबंधित विविध समस्या, प्रलंबित तक्रारी, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाबाचा प्रश्न, कृषी व घरगुती ग्राहकांच्या अडचणी, स्मार्ट मीटरबाबतच्या तक्रारी तसेच पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य समस्यांवर तोडगा काढण्यासाठी सोमवार, दि. १३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पाचोरा शहरातील भडगाव रोडवरील व्यापारी भवन येथे विशेष संयुक्त आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक आमदार किशोर आप्पा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून, मतदारसंघातील वाढत्या वीजविषयक तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रशासन, महावितरणचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना एकाच व्यासपीठावर आणून समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. बैठकीत मतदारसंघातील वीजपुरवठा व्यवस्थेचा सर्वंकष आढावा घेत विविध विभागांमध्ये समन्वय निर्माण करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यावर भर दिला जाणार आहे.आमदार किशोर आप्पा पाटील मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकीस प्रांताधिकारी भूषण अहिरे, पाचोरा तहसीलदार विजय बनसोडे, भडगाव तहसीलदार शीतल सोलाट, पाचोरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मंगेश देवरे, भडगाव नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती मालगावे, कृषी अधिकारी सुधाकर कराड, दीपक ठाकूर, गटविकास अधिकारी सुधाकर मुंढे, के. बी. अंजने

तसेच महावितरण कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध तक्रारदार नागरिक, शिवसेनेचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.मतदारसंघातील वीजविषयक प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार असल्याने संबंधित नागरिकांनी आपल्या समस्या, सूचना व तक्रारींसह उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार किशोर आप्पा पाटील यांचे स्वीय सहाय्यक राजेश पाटील यांनी केले आहे.

वीजविषयक प्रश्नांवर निर्णय

सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध तक्रारदार नागरिक, शिवसेनेचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. वीजविषयक प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार असल्याने संबंधित नागरिकांनी आपल्या समस्या, सूचना व तक्रारींसह उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार किशोर आप्पा पाटील यांचे स्वीय सहाय्यक राजेश पाटील यांनी केले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

शासकीय आयटीआय जळगावच्या विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात

दुर्गंधी व भटक्या कुत्र्यांचा वाढता त्रास; कारवाई न झाल्यास 'अर्धनग्न उपोषण'चा इशारा

जन सम्राट टाईम्स

जळगाव | प्रतिनिधी: जळगाव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) परिसरालगत असलेल्या कचरा संकलन केंद्रामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, हा कचरा डेपो तातडीने अन्यत्र हलवावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य रुग्णसेवा व श्रमिक कामगार संघटनेने केली आहे. यासंदर्भात जळगाव महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले असून, १० दिवसांत कारवाई न झाल्यास 'अर्धनग्न उपोषण' करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. संघटनेच्या निवेदनानुसार, शासकीय आयटीआयच्या मुख्य इमारतीच्या भिंतीलगत कचरा संकलन केंद्र असल्याने पावसाळ्यात परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत आहे. कचऱ्यात पावसाचे पाणी साचल्यामुळे अस्वच्छता वाढली असून, विद्यार्थ्यांना वर्गात बसणे तसेच जेवण करणेही कठीण होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय संस्थेच्या परिसरात

भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याने प्रशिक्षणार्थी आणि कर्मचारी यांना सतत त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भटक्या कुत्र्यांवरही तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि आरोग्य लक्षात घेता पुढील १० दिवसांच्या आत कचरा संकलन केंद्र अन्यत्र हलवावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. अन्यथा कायदेशीर मार्गाने 'अर्धनग्न उपोषण' आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. हे निवेदन देताना महाराष्ट्र राज्य रुग्णसेवा व श्रमिक कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष समाधान भाऊ पवार, जिल्हा सचिव चंद्रकांत पाटील, शहराध्यक्ष पवन खंबायत, शहर उपाध्यक्ष कल्पेश व्हिरोडकर, शहर सचिव नंदकिशोर पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन निवेदनाच्या प्रती स्थानिक आमदार राजूमामा भोळे तसेच जळगाव महानगरपालिकेच्या महापौरांनाही पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली.

पाणी साचल्यामुळे अस्वच्छता वाढली

विद्यार्थ्यांना वर्गात बसणे तसेच जेवण करणेही कठीण होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय संस्थेच्या परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढल्याने प्रशिक्षणार्थी आणि कर्मचारी यांना सतत त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306